महाराष्ट्र अ‍ॅक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र. मअप/अ‍ॅक्यू.संस्था/वर्ग नियमितता/९०७/२०२६ दिनांक : २८/०७/२०२६

**परिपत्रक**

विषय : महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त अ‍ॅक्यूपंक्चर संस्थांमध्ये अ‍ॅक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाचे नियमित प्रत्यक्ष वर्ग घेण्याबाबत.

महाराष्ट्र अ‍ॅक्यूपंक्चर परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील विविध मान्यताप्राप्त अ‍ॅक्यूपंक्चर संस्थांमध्ये अ‍ॅक्यूपंक्चर चिकित्सा पदविका (Diploma in Acupuncture Therapy) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे.

परिषदेच्या निदर्शनास आले आहे की, काही विद्यार्थी परिषदेकडे तसेच संबंधित अ‍ॅक्यूपंक्चर संस्थांकडे सदर अभ्यासक्रमाचे वर्ग ऑनलाईन पद्धतीने घेण्याबाबत मागणी करीत आहेत.

या संदर्भात सर्व संबंधित संस्था, संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांना याद्वारे स्पष्ट करण्यात येते की, अ‍ॅक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम हा प्रत्यक्ष प्रशिक्षणावर आधारित (Hands-on Training Programme) व्यावसायिक व कौशल्याधारित अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमामध्ये सैद्धांतिक शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, क्लिनिकल प्रशिक्षण, रुग्ण तपासणी, उपचारपद्धतीचे प्रत्यक्ष निरीक्षण, अ‍ॅक्यूपंक्चर बिंदूंची ओळख, तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण व आवश्यक व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करणे अनिवार्य आहे.

त्यामुळे सदर अभ्यासक्रमाचे नियमित वर्ग, प्रात्यक्षिके व प्रत्यक्ष प्रशिक्षण संबंधित मान्यताप्राप्त संस्थेच्या परिसरात नियमानुसार घेणे बंधनकारक आहे. संपूर्ण अभ्यासक्रम अथवा नियमित प्रत्यक्ष वर्गांच्या ऐवजी केवळ ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देण्यास परवानगी राहणार नाही.

तरी सर्व संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार अथवा इतर कोणत्याही कारणास्तव केवळ ऑनलाईन शिक्षण घेण्याच्या अटीवर कोणत्याही विद्यार्थ्यास सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेश देऊ नये. तसेच, नियमित प्रत्यक्ष वर्ग व प्रशिक्षणास उपस्थित राहणे आवश्यक असल्याची माहिती प्रवेशापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्यास स्पष्टपणे देण्यात यावी.

या परिपत्रकातील निर्देशांचे उल्लंघन करून कोणत्याही संस्थेने केवळ ऑनलाईन पद्धतीने अभ्यासक्रम चालविल्याचे अथवा विद्यार्थ्यास अशा स्वरूपाचा प्रवेश दिल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित प्रकरणाची चौकशी करून नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. परिस्थितीनुसार संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करणे तसेच संबंधित संस्थेची मान्यता, संलग्नता अथवा नोंदणी रद्द करणे किंवा निलंबित करणे यासह इतर प्रशासकीय कारवाई करण्यात येऊ शकते.

तरी सर्व मान्यताप्राप्त अ‍ॅक्यूपंक्चर संस्था, संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी सदर परिपत्रकाची गांभीर्याने नोंद घेऊन त्यातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

हे परिपत्रक तत्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

(नारायण नवले)
प्रबंधक
महाराष्ट्र अ‍ॅक्यूपंक्चर परिषद, मुंबई

महाराष्ट्र अ‍ॅक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

No. MCA/ACU-Institutions/Class Regularity/607/2026 Date: 28/07/2026

## CIRCULAR

Subject: Conduct of Regular Physical Classes for the Diploma in Acupuncture Therapy Course in Recognized Acupuncture Institutions in Maharashtra

The Maharashtra Council of Acupuncture has granted permission to various recognised Acupuncture Institutions in the State to conduct the Diploma in Acupuncture Therapy course.

It has come to the notice of the Council that some students are requesting the Council as well as certain Acupuncture Institutions to conduct classes for the said course through the online mode.

In this regard, all concerned institutions, managements, Principals, faculty members and students are hereby informed that the Diploma in Acupuncture Therapy is a professional, skill-based and hands-on training programme. In addition to theoretical instruction, the course requires practical demonstrations, clinical training, patient assessment, observation of treatment procedures, identification of acupuncture points, supervised practical training and the acquisition of essential professional skills.

Therefore, it is mandatory that regular classes, practical sessions, demonstrations and clinical training for the said course be conducted physically and regularly at the premises of the concerned recognised institution, in accordance with the rules and guidelines prescribed by the Council.

The course shall not be conducted entirely through online mode, nor shall online classes be treated as a substitute for the mandatory regular physical classes, practical training and clinical exposure required under the course.

Accordingly, all institution managements are directed not to admit any student to the Diploma in Acupuncture Therapy course on the condition or assurance that the course will be conducted entirely through online mode, irrespective of any request or demand made by the student. Every institution shall clearly inform prospective students, before admission, that regular attendance in physical classes, practical sessions and clinical training is compulsory.

If any institution is found to have admitted students on the assurance of providing the course entirely through online mode, or is found to be conducting the course in violation of the above directions, the matter shall be subjected to appropriate inquiry and necessary action shall be initiated in accordance with the applicable rules and regulations.

Such action may include, depending upon the facts and circumstances of the case, cancellation of the admission of the concerned student(s), suspension or cancellation of the recognition, affiliation or registration of the concerned institution, and/or any other appropriate administrative action as may be deemed necessary by the Council.

All recognised Acupuncture Institutions, institution managements, Principals, faculty members and students are therefore directed to take due note of this Circular and ensure its strict and effective compliance.

This Circular shall come into force with immediate effect.

(Narayan Nawale)
Registrar
Maharashtra Council of Acupuncture, Mumbai